Rotary Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

फेब्रुवारी - २०२६ | बावीसावा अंक

## रोटरी वर्धापन दिन विशेषांक



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary



## Guest Editor Rtn.Yenesh Shaha



प्रिय रोटेरियन बंधू-भगिनींनो,

रोटरी दिशा या आपल्या साप्ताहिक बुलेटीनच्या रोटरी १२१ वा वर्धापनदिन विशेषांकाचा अतिथी संपादक म्हणून आपल्यासमोर मनोगत व्यक्त करताना मला अत्यंत आनंद होत आहे. २३ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण रोटरी परिवारासाठी विशेष महत्त्वाचा आहे. या दिवशी मानवतेची सेवा, मैत्री आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांवर आधारित रोटरीची स्थापना झाली आणि आज १२१ वर्षांनंतरही ही संस्था जगभरात समाजपरिवर्तनाचे कार्य करत आहे.रोटरी ही केवळ एक संस्था नाही, तर ती एक विचारधारा आहे. ''सर्व्हिस अबाव्ह सेल्फ'' या तत्त्वावर आधारित रोटरीने लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संरक्षण, गरिबांसाठी मदत, आपत्ती व्यवस्थापन आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी रोटरी सातत्याने कार्यरत आहे.रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन हा देखील या महान परंपरेचा एक अभिमानास्पद भाग आहे. आपल्या क्लबने विविध सामाजिक प्रकल्पांद्वारे समाजात चांगले कार्य केले असून अनेक गरजू व्यक्तींना मदतीचा हात दिला आहे. प्रत्येक सदस्याच्या सहभागामुळेच हे कार्य शक्य झाले आहे.रोटरीचे खरे बळ म्हणजे मैत्री (फेलोशिप) आणि सेवेची भावना. रोटरीमध्ये आपण केवळ समाजसेवा करत नाही, तर एकमेकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करतो. हीच भावना आपल्याला अधिक प्रेरित करते आणि समाजासाठी अधिक कार्य करण्याची ऊर्जा देते.१२१ व्या वर्धापनदिनानिमित्त आपण सर्वांनी पुढील काळात अधिक जोमाने समाजकार्य करण्याचा संकल्प करावा. नव्या सदस्यांना सहभागी करून रोटरीची सेवा अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करूया.या विशेषांकाच्या निमित्ताने सर्व रोटेरियन बंधू-भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा. आपण सर्वांनी एकत्र येऊन रोटरीचे आदर्श पुढे नेऊया आणि समाजासाठी अधिक कार्य करूया हीच अपेक्षा.''रोटरी ही सेवा, मैत्री आणि मानवतेचा उत्सव आहे.''

धन्यवाद.

रो.येनेश शहा<br>
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- राष्ट्रगीताने मिटींग ची सुरुवात झाली.
- फोरवे टेस्ट चे वाचन सामुहिकरीत्या झाले.
- मागील मिटींग चे वाचन सचिव पवन मालपानी यांनी केले.. साप्ताहिक पत्रव्यवहार अध्यक्षांनी सादर केला.
- अध्यक्षांनी सर्व सभासदांचे मनःपूर्वक स्वागत केले.
- अध्यक्ष,सचिव व बीओडी मेम्बर्स साठी झुम मिटींग आयोजित केली होती. व्हिजन ३१३२ कार्यक्रमाची हि मिटींग होती. या मिटींग मध्ये डिजी व डिस्ट्रीक्ट डायरेक्टर यांनी मार्गदर्शन केले.
- गेस्ट श्री विलास जी भिसे सरपंच पिंप्री अंबा व तात्यासाहेब पालकर सोसायटी चेअरमन यांचे स्वागत माजी अध्यक्ष राजगोपाल सारडा यांनी केले.
- हेल्थ चेकअप कॅम्प माहिती रो. किशोर दाताळ यांनी दिली.
- रो. शिरीष उटगे यांचा केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.
- ट्रॅफीक अवेअरनेस साठी कार्यक्रम प्रोजेक्ट चेअरमन रो. रोहित कुलकर्णी यांनी पोद्दार हॉस्पिटल च्या मदतीने घेण्यात येईल असे सांगितले.
- गेल्या वर्षी सीएसआर फंडातून शित शवपेटी निलंगा येथील संस्थेला लोकार्पण करत असल्याचे अध्यक्षांनी सांगितल
- क्लब बुलेटिन : साप्ताहिक रोटरी दिशा चे अनावरण गेस्ट यांच्या हस्ते करण्यात आले. अतिथी संपादक म्हणून रो. उमेश पत्रावळे यांनी कार्य केले.
- टिआरएफ फंडाला १००० डॉलर दिल्यामुळे माजी अध्यक्ष रो. रविंद्र बनकर यांचे अभिनंदन केले गेले.
- को. रविंद्र बनकर यांनी ग्लोबल ग्रँट व सीएसआर ग्रँट बद्दल माहिती दिली.
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. प्रशांत भाटगावे यांनी केली.

### Man of The Meeting



Rtn.Vishal Bhutad

### 1st Come in the Hall



Rtn.Vishnudas Toshniwal

# Celebrating 121 Years of Service: Rotary's Inspiring Journey

23rd February – Rotary International Foundation Day23rd February marks a historic and proud moment for Rotarians across the globe. On this day in 1905, a young attorney named Paul Harris gathered three friends in Chicago with a simple yet powerful idea — to create a circle of professionals who could build friendship and serve their community. That humble meeting led to the birth of Rotary International, an organization that has now completed 121 years of dedicated service above self.

A Vision That Became a Global Movement

From a small club in Chicago to a worldwide network of more than 1.4 million members, Rotary has grown into a symbol of integrity, fellowship, and humanitarian service. Rotary's guiding principle — "Service Above Self" — continues to inspire generations of leaders to take meaningful action in their communities.

Over the decades, Rotary has expanded its reach to more than 200 countries and geographical areas, touching millions of lives through sustainable projects and impactful initiatives.

Areas of Focus – Changing Lives Globally

Rotary concentrates on seven key areas of focus:

- Promoting Peace
- Fighting Disease
- Providing Clean Water & Sanitation
- Saving Mothers & Children
- Supporting Education
- Growing Local Economies
- Protecting the Environment

One of Rotary's most remarkable achievements is its leadership in the global fight against polio through the Polio Plus initiative, in partnership with organizations like the WHO and UNICEF. Because of these efforts, the world is closer than ever to becoming polio-free.

Rotary – More Than Service

Rotary is not only about projects — it is about people and purpose. It builds lifelong friendships, nurtures leadership skills, encourages ethical practices, and unites individuals from diverse cultures and professions under one common goal: to make the world a better place.Rotary clubs serve as platforms where ideas turn into action and compassion transforms into community impact.

Rotary in India

India has one of the largest Rotary memberships in the world. Indian Rotarians have made outstanding contributions in healthcare camps, education initiatives, rural development, water conservation, disaster relief, and youth empowerment programs. Their dedication reflects Rotary's commitment to grassroots transformation.

Celebrating 121 Years

As we celebrate 121 glorious years of Rotary, we honor the vision of Paul Harris and the countless Rotarians who carried forward his dream. Each project completed, each life touched, and each community empowered is a tribute to this enduring legacy. This anniversary is not just a celebration of history — it is a renewed commitment to the future. The journey continues, guided by compassion, leadership, and the unwavering spirit of service.

Let us proudly say:"Happy 121st Birthday, Rotary! May we continue to serve with dedication, unity, and purpose."

Service Above Self – Then, Now, and Always.

# Rotary Mid Town this Week  Photo Gallery









मित्रांनो,

Rotary International च्या १२१ व्या वाढदिवसानिमित्त या फेब्रुवारी महिन्यात आपण सर्वांनी एक संकल्प करूया

आपल्या प्रत्येकाकडून किमान $50 किंवा $100 TRF – PolioPlus Fund साठी वैयक्तिक योगदान देऊया.

The Rotary Foundation अंतर्गत असलेल्या PolioPlus Fund मध्ये योगदान देताना आपल्याला Gift व Recognition मिळेलच, पण त्याहून मोठे समाधान म्हणजे आपल्या क्लबला $1500 चा टप्पा पार करून “Polio Champion Club” पुरस्कार मिळवून देण्याचा अभिमान!

आज आपण दिलेले $50 / $100 उद्या एखाद्या बालकाच्या आयुष्यातील अपंगत्व टाळू शकते.

चला १२१ व्या वाढदिवसानिमित्त आपण सर्व मिळून “End Polio Now” चा नारा प्रत्यक्ष कृतीत उतरवूया!

आजच डोनेशन करा आणि आपल्या क्लबला Polio Champion बनवा!




- सुधिर लातुरे- District Governor
- रो सलीम मुजावर- डिस्ट्रिक्ट डायरेक्टर PolioPlus

## Congratulations



आपल्या क्लब चे सदस्य रो.योगेश काळे यांना अतिशय सन्माननीय असा लोकमत समूह तर्फे दिला जाणारा उत्कृष्ट व्यवसाय सेवा पुरस्कार त्यांच्या टुरिजम क्षेत्रात उत्कृष्ट कार्य साठी गो फॉर टुर या एजन्सीला मिळाला आहे.
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा